वर्ष-०७ अंक-०२ मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ डिसेंबर-२०२० पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

PG 2 बोरिवली येथील उच्चभ्रू सोसायटी मधील थरार नाट्य विवाहित महिलेला जाळण्याचा प्रयत्न

3 → तर लाखभर शेतकऱ्यांनी दिल्लीपर्यंत यायचे कारणच काय?;

डिझेल चोरी करणाऱ्या टोळीचा छडा लावून केले जेरबंद ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## करोनाचे रुग्ण वाढत असताना सरकारची खासगी रुग्णालयांपुढे सपशेल शरणागती




**मुंबई : महाराष्ट्रात करोना रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असताना खाजगी रुग्णालयातील बेडचे दर तसेच उपचाराचे दर नियंत्रित करणाऱ्या आरोग्य विभागाच्या आदेशाला अवघ्या १५ दिवसांची मुदतवाढ देण्याचा आदेश राज्य सरकारने जारी केला आहे. खासगी रुग्णालयांपुढे सरकारची ही सपशेल शरणागती असल्याची भावना वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.**

महाराष्ट्रात करोनाचा पहिला रुग्ण ९ मार्च रोजी सापडला. त्यानंतर राज्यात मोठ्या प्रमाणात करोना रुग्ण वाढू लागले आणि खासगी रुग्णालयांनी या रुग्णांवर उपचार करताना अवास्तव बिले आकारण्यास सुरुवात केली. लाखो रुपयांच्या बिलांमुळे रुग्ण व नातेवाईक त्रस्त झाल्यानंतर आरोग्य विभागाने २१ मे २०२०रोजी एपिडेमिक अ‍ॅक्ट १८९७, डिझास्टर मॅनेजमेंट अ‍ॅक्ट २००५,राज्य अत्यावश्यक सेवा कायदा २०११,राज्य नर्सिंग होम अ‍ॅक्ट २००६ आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अ‍ॅक्ट १९५० अंतर्गत खासगी रुग्णालयांनी बेडसाठी किती दर आकारावे तसेच उपचारासाठीचे दर निश्चित करणारे आदेश जारी केले.

३१ ऑगस्ट रोजी या आदेशाची मुदत संपणार असताना सरकारने पुन्हा तीन महिन्यांसाठी या आदेशाला मुदतवाढ दिली. ही मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपत असून करोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता लक्षात घेऊन या आदेशाला पुन्हा तीन महिने मुदतवाढ द्यावी असा प्रस्ताव आरोग्य विभागाने सादर केला होता. मात्र आरोग्य विभागाचा प्रस्ताव डावलून केवळ १५ दिवसांसाठी म्हणजे १५ डिसेंबरपर्यंतच खाजगी रुग्णालयातील करोना रुग्णांवरील उपचाराच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन आदेश आज जारी करण्यात आला आहे.

गंभीर बाब म्हणजे करोना काळात अन्य आजारांच्या रुग्णांवरील खर्चावरही या आदेशान्वये नियंत्रण ठेवण्यात आले होते. मात्र नागपूर खंडपीठाने करोनाव्यतिरिक्तच्या आजारांवरील उपचाराच्या खर्चावर नियंत्रण ठेवता येणार नाही असा आदेश दिला. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात आरोग्य विभागाने याचिका केली असून त्याची सुनावणी सुरु असताना सरकारने करोनारुग्ण उपचारासाठीच्या दर नियंत्रण आदेशाला केवळ १५ दिवसांसाठी मुदतवाढ दिल्यामुळे ...पान २ वर...

## कोरोनामुळे 10वी आणि 12वीच्या परीक्षा उशिरा होणार

### देशातच नाही तर संपूर्ण जगात कोरोना व्हायरसने थैमान घातलं आहे.



मुंबई : देशातच नाही तर संपूर्ण जगात कोरोना व्हायरसने थैमान घातलं आहे. कोरोनामुळे जगाची आर्थिक घडी ...पान २ वर...

## टोलनाक्यांसाठी जकातनाक्यांच्या जमिनी?




मुंबई, मुंबईसह राज्यातील विविध महामार्गांजवळील टोलनाक्यांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने 'एमएसआरडीसी'कडून टोलनाक्यांजवळील बंद पडलेल्या ...पान २ वर...

## CCTV
## मुंबईत लिफ्टमध्ये अडकल्याने पाच वर्षीय मुलाचा मृत्यू




मुंबईतील धारावी येथे लिफ्टच्या दुर्घटनेत एका पाच वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. लाकडी दरवाजा आणि बाहेरच्या ग्रीलमध्ये अडकल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचं सीसीटीव्ही फुटेजही समोर आलं आहे.

पोलीस आणि सीसीटीव्ही फुटेजनुसार, मोहम्मद हुजैफा शेख हा पाच वर्षीय मुलगा आपल्या लहान भाऊ-बहिणीसह लिफ्टमधून चालला होता. दरम्यान, तो लिफ्टचा लाकडी दरवाजा आणि बाहेरच्या ग्रीलमध्ये अडकला. त्याच्या भावंडांनी लिफ्टमधील बटन दाबल्याने मोहम्मद अडकलेला असतानाच लिफ्ट वरच्या मजल्याकडे निघाली. या घटनेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

दरम्यान, मोहम्मदला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषीत केले. धारावीतील पालवाडीच्या कोजी शेल्टर इमारतीत शनिवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

## 4 टन बेकायदेशीर जनावरांचे मांस भरलेला टेम्पोची नयानगर पोलीसांनी केली धर पकड




मीरा-भाईंदर - मीरा रोड रस्त्याच्या शीतलनगर परिसरात नाकाबंदी असताना अंदाजे चार टन जनावरांचे मास बेकायदा विक्री करण्यासाठी आलेला टेम्पो जप्त करण्यात आला. नया नगर पोलीसांनी चालकासह त्याच्या एका साथीदाराला अटक करून गुन्हा दाखल केला.मीरा-भाईंदर शहरात या अगोदरदेखील बेकायदेशीर मांसाची विक्री वाहतूक कत्तल होत असल्याचे उघड झाले आहे. मात्र. मीरा-भाईंदर शहरातील पोलीस कर्मचारी, मनपातील आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन, पशुसंवर्धन विभाग, आर्थिक बाबी तडजोड करून मदत केली जाते. इतक्या मोठ्या प्रमाणात मांस शहरात येतेच कसे? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. नयानगर पोलीसांनी नाकाबंदी दरम्यान चार टन जनावरांचे मांस भरलेला टेम्पो पकडला. दोन जणांना अटक देखील केली आहे. मात्र, हे नेमके आले कुठून? यांचा मुख्य सूत्रधार कोण आहे? ही बेकायदेशीर कत्तल होते कुठे? यांचा खोलात जाऊन तपास पोलीसांनी करणे गरजेचे आहे.मीरा रस्त्याच्या नयानगर परिसरात मोठ्या प्रमाणात जनावरांच्या मांसाची विक्री केली जाते. परंतु, आजपर्यंत कोणत्याच विभागाचा अधिकारी कर्मचारी दुकानात जाऊन तपासणी करताना दिसले नाहीत. बीफ संदर्भात तपासणी करणे गरजेचे आहे की, बेकायदेशीर कत्तल करून विक्रीसाठी ...पान २ वर...

## चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीला वाशी पोलीस ठाणे यांनी केले गजाआड



वाशी शहरात चेन स्नॅचिंग प्रकारात वाढ झाली असून, या आरोपींचा तपास करण्याकरिता वाशी पोलीस ठाण्याकडून विशेष पथक नेमण्यात आले. सन २०१९/२०२० मधील चेन स्नॅचिंग गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अहोरात्र मेहनत करून सुमारे ७० ठिकाणाचे अधिक सी.सी.टी.व्ही फुटेज पाहण्यात आले आणि तांत्रिक तपास करून गुप्त बातमीदारांकडून माहिती घेऊन शरद तांबे नामक (वय२१) राहायला. पनवेल, याच्याकडून तब्बल २५,०००/-चे मंगळसूत्र आणि २५,०००/-ची सोन्याची चैन मालमत्ता हस्त करण्यात आली.वाशी पोलीस ठाणे गु.रजि. नंबर. ३६८/२०२०, २५५/२०१९ भा.द.वि कलम ३७९,३९२,३९२,३४ वरुण अटक करण्यात आले. आरोपीकडे अधिक तपासणी करून नवी मुंबई पोलीस ...पान २ वर...

## मोबाईल हिसकावून चोरी करणारी टोळी गजाआड; वाशी पोलीस ठाणे यांनी केली कारवाई




वाशी पोलीस ठाण्यात होणाऱ्या वारंवार मोबाईल चोरीच्या घटनांमुळे सतर्क होऊन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सूचना देण्यात आल्या.त्यामुळे वाशी पोलीस ठाण्याचे बीट मार्शल यांना सदर घटनेच्या अनुषंगाने तात्काळ दखल घेण्याबाबत आदेश देण्यात आले.दिनांक. २२/११/२०२० रोजी हर्षदा झेंडे नामक महिला व तिचा मित्र यांची मिनी शिशोर वाशी याठिकाणी एम. बीए.सीएटी ऑनलाईन परीक्षेचा अभ्यास करत असताना एका अनोळखी माणसाने हर्षदा झेंडे यांच्या हातातील रेडमी कंपनीचा मोबाईल हिसकावून पळून गेला. त्याच वेळी बीट मार्शल ४ चे अंमलदार पोलीस ना. सुनील पाटील, पोलीस ना. सतीश सु पाटील यांच्यासह पोलीस ना. परशुराम बिन्नर यांना नियंत्रण कक्षाकडून माहिती मिळाल्यावरून हर्षदा झेंडे यांना मदत करण्यासाठी तात्काळ मिनी शिशोर याठिकाणी गेले. पोलीस पथक व हर्षदा झेंडे आणि त्यांचे मित्र यांनी सदर आरोपी नामक शरीफ सिद्धिकी चा (वय२४) पाठलाग करून त्याला हिरानंदानी हॉस्पिटल वाशी नवीमुंबई या ठिकाणी ताब्यात घेतले.सदर आरोपी शरीफ सिद्धिकी कडून हर्षदा झेंडे यांचा रेडमी मोबाईल फोन मिळून आला. हर्षदा झेंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाणेस गु.रजि.क्र. ३७६/२०२० कलम ३९२ भादवि नोंद करण्यात आली असून शरीफ सिद्धिकी याला अटक करण्यात आली. आरोपीला दिनांक. २७/११/२०२० पर्यंत पोलीस कोठडी देण्यात ...पान २ वर...

## ७१ वर्षाच्या आजींनी सोनसाखळी चोरट्याला केला प्रतिकार



पुणे :पायी जात असताना मोटारसायकलवरील चोरट्याने ७१ वर्षाच्या आजींच्या गळ्यातील सोनसाखळी व मंगळसुत्र हिसकावण्याचा प्रयत्न केला. पण, सावध असलेल्या महिलेने चोरट्याचा प्रतिकार केल्याने त्याने मोटारसायकल सोडून पळून जावे लागले. ही घटना बिबवेवाडीतील लोकेश सोसायटीच्या अंतर्गत रस्त्यावर शनिवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी शालिनी शरद तिसगावकर (वय ७१, रा. लोकेश सोसायटी, बिबवेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या शनिवारी रात्री सोसायटीच्या आवारात फिरायला गेल्या होत्या. त्या घरी परतत असताना मोटारसायकलवरील एका तरुणाने त्यांना थांबवून पत्ता विचारला. त्याला पत्ता सांगत असताना त्याने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी व मंगळसुत्र हिसकाविण्याचा प्रयत्न केला.

## मुंबईनगरीला ड्रग्स माफियांचा विळखा, तब्बल 100 कोटींची झाली तस्करी!



**अंमली पदार्थ विरोधी पथकाने या कारवायांमध्ये तब्बल 364 किलो 244 ग्रॅम ड्रग्स जप्त केले आहे, या ड्रग्सची किंमत 19 कोटी 20 लाख इतकी आहे.**

मुंबई, मुंबई हे ड्रग्स विक्रीचा प्रमुख केंद्र झाले असून इथे उच्चभ्रू सोसायट्यांपासून ते झोपडपट्टीमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर ड्रग्स खरेदी विक्री केली जात असल्याचे समोर आले आहे. ड्रग्स माफियांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांना फार मोठी कसरत करावी लागते आणि म्हणूनच सध्या ड्रग्स माफिया किंवा पेडलर्सच्या विरोधात मुंबई पोलिसांनी मोहिमच उघडली आहे. त्यामुळे आतापर्यंत कोटयवधी रुपयांचे ड्रग्स जप्त करून शेकडो आरोपींना तुरुंगात पाठवले आहे.


मुंबई ही नेहमीच दहशतवाद्यांसोबतच ड्रग्स माफियांच्या टार्गेटवर राहिली आहे. कारण, या मुंबईत दहशतवादी हल्ले करुन आर्थिक नुकसान करण्याचे मनसुबे पाळले जातात तर याच मुंबईत ड्रग्स विकून ड्रग्स माफिया अरबो खरबो रुपये कमवतात. दोन्ही बाजूने मुद्दा आहे तो पैशांचा त्यामुळे मुंबई ही सतत ड्रग्स माफियांसाठी केंद्र बिंदूच राहिली आहे.

मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने वर्षभरात 35 कारवाया करत 47 आरोपींना अटक केली आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाने या कारवायांमध्ये तब्बल 364 किलो 244 ग्रॅम ड्रग्स जप्त केले आहे, या ड्रग्सची किंमत 19 कोटी 20 लाख इतकी आहे. तर दुसरीकडे मुंबई पोलिसांनी गेल्या वर्षभरात ड्रग्सविरोधात 120 कारवाया केल्यात.

या सगळ्या कारवायांमध्ये 135 आरोपींना अटक करून ...पान २ वर...

## अभिनेत्रीला लग्नाचं आमिष दाखवून दोन वर्ष केला बलात्कार, पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

### पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरु केला आहे



वेब सीरिज आणि चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या एका अभिनेत्रीने कास्टिंग डायरेक्टर आयुष तिवारीवर बलात्काराचा आरोप केला आहे. याप्रकरणी आयुष तिवारीविरोधात मुंबईतील वर्सोवा पोलीस स्थानकात गुन्हा दाखल झाला आहे. आयुषने या पीडितेला लग्नाचं आमिष ...पान २ वर...

## दंडात्मक कारवाईनंतर मुंबई पालिकेकडून मुखपट्टी भेट

### करोना संसर्ग रोखण्यासाठी मुखपट्टीचा वापर आवश्यक आहे.



सार्वजनिकठिकाणी मुखपट्टीविना फिरणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई केल्यानंतर सोबत त्यांना एक मुखपट्टी विनामूल्य देण्याचा निर्णयमहानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.

करोना संसर्ग रोखण्यासाठी मुखपट्टीचा वापर आवश्यक आहे. मुखपट्टी न लावता घराबाहेर पडणाऱ्यांकडून २०० ...पान २ वर...

# आदिवासींच्या जमिनींवर ‘उपरे’ कोटय़धीश

## बडोदा-मुंबई महामार्गाच्या पनवेलमधील भूसंपादन प्रक्रियेत ‘लाभार्थी’ गैरव्यवहार

मुंबई ते बडोदा या राष्ट्रीय महामार्गासाठी पनवेल तालुक्यातील गावांत राबवलेल्या भूसंपादन प्रक्रियेतून स्थानिक आदिवासींऐवजी दलाल आणि तथाकथित विकासक कोटय़वधींचे धनी झाले आहेत. भूसंपादनाची अधिसूचना निघाल्यानंतर जमीन खरेदी-विक्री व्यवहारावर बंदी असताना या गावांतील आदिवासींकडून अतिशय कमी दरात जमिनी खरेदी करून त्याबदल्यात काहींनी कोटय़वधींची नुकसानभरपाई मिळवल्याचे उघड झाले आहे.भूसंपादन अधिसूचनेनंतरच्या या खरेदी व्यवहारांना बेकायदा ठरवण्याऐवजी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय आणि पनवेल प्रांत कार्यालयाने आदिवासींच्या जमिनी खरेदी केलेल्यांना पाचपट मोबदल्याचे धनादेशही दिले. विशेष म्हणजे, करोना टाळेबंदीमुळे सर्व व्यवहार ठप्प असताना हे जमीन व्यवहार मात्र जोरात सुरू होते, असे स्पष्ट होते.मुंबई आणि गुजरातमधील बंदरे रस्तेमार्गानेही जोडण्याच्या योजनेअंतर्गत मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या महामार्गाचा २० किलोमीटर टप्पा पनवेल तालुक्यातून जातो. त्यासाठी शिरवली, आंबेत तर्फे तळोजे, वांगणी तर्फे तळोजे आणि मोर्बे या चार गावांतील जमीन संपादित केली आहे. या भूसंपादनाची अधिसूचना सरकारने ११ सप्टेंबर २०१८ रोजी काढली होती. तर जमिनीची मोजणी आणि सर्वेक्षण जुलै २०१९मध्ये पूर्ण झाले. केंद्र सरकारच्या भूसंपादन कायद्यानुसार एखाद्या सरकारी प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाची अधिसूचना काढल्यानंतर बाधित होणाऱ्या जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार करता येत नाहीत. केवळ अपवादात्मक परिस्थितीत आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीनेच असे व्यवहार करता येतात. मात्र, सप्टेंबर २०१८मध्ये भूसंपादनाची अधिसूचना जारी झाल्यानंतर बाजारभावापेक्षा तीन ते चारपट अधिक मोबदला मिळवण्यासाठी काही दलाल आणि विकासकांनी आदिवासींकडून जमीन खरेदीचा सपाटा लावला.अधिसूचनेबाबत माहिती नसलेल्या शेतकऱ्यांनीही रोख रक्कम मिळत असल्याचे पाहून ९० हजार ते एक लाख रुपये गुंठा या दराने आपल्या जमिनी विकल्या. त्यापैकी अनेक व्यवहार जमिनींचे सर्वेक्षण झाल्यानंतरही करण्यात आले आणि महसूल विभागातील जिल्हा व तालुका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सर्वेक्षणानंतरही जमिनींच्या सातबाऱ्यावर फेरफार करून दिले. त्याहून



धक्कादायक बाब म्हणजे, करोना टाळेबंदी शिथिल होऊ लागताच पनवले प्रांत कार्यालयाने तातडीने भूसंपादन मोबदला वितरण सुरू केले. एकूण ७० खातेधारकांपैकी पहिल्या यादीत १५ खातेधारकांना तातडीने नुकसानभरपाई देण्यात आली. त्यातही स्थानिक आदिवासींऐवजी बाहेरून येऊन जमीन खरेदी करणारे विकासक, दलाल यांना प्राधान्याने धनादेश देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.चार गावांमधील एकूण ७० खातेधारकांचा निवाडा अंतिम केल्यानंतरही प्रांत कार्यालयाने नव्याने जमीन खरेदी करणाऱ्यांना पाचपट मोबदला देण्याची केलेली घाई या व्यवहारांतील संशयास्पद बाबींकडे निर्देश करीत आहे.ऑक्टोबरमध्ये ज्या १५ लाभार्थीना प्रांत कार्यालयाने नुकसानभरपाईचे धनादेश दिले त्यांत तथाकथित विकासक आणि बाहेरच्या काही दलालांचा समावेश असल्याचे आढळते. त्यामध्ये नवी मुंबईतील मराठी विकासकांच्या संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या एका ‘स्वयंघोषित’ विकासकाच्या कुटुंबाला २२ कोटींचा मोबदला मिळाला आहे. संबंधित विकासकाने २०१४ साली सरकारजमा असलेली हजारो गुंठे जमीन मंत्र्यांच्या स्वाक्षरीनंतर आणि सनदशीर मार्गाने खरेदी केल्याचे दस्तावेज हाती आले आहेत. विशेष म्हणजे खरेदी केलेल्या ५३ हजार चौरस मीटर जमिनीसाठी २२ कोटी रुपयांचा धनादेश सर्वात प्रथम देण्यात आला. धनादेश मिळालेल्या १५ जणांपैकी अनेकांनी याच वर्षी जमीन खरेदी केल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या १५ लाभार्थीना धनादेश वाटप झाल्यानंतर अनेक दिवस वेगाने चाललेली ही प्रक्रिया थंडावली. या संदर्भात प्रस्तुत प्रतिनिधीने प्रांत कार्यालयातील अधिकाऱ्यांना विचारणा केल्यानंतर, काही दिवसांत उर्वरित लाभार्थीना धनादेशांचे वाटप सुरू करण्यात आले. जमिनीचा अंतिम निवाडा जाहीर झाल्यानंतर लाभार्थी बदलणे आणि संबंधित सातबारा उताऱ्यांवरील खरेदी-विक्रीचे व्यवहार होणे अशक्य आहे. असे झाले असल्यास या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल, असे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र रायगड अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मान्यतेनंतर आदिवासींच्या जमीन व्यवहारांना शासनमान्यता मिळवावी लागते. त्यामुळे संबंधित जमिनींचे व्यवहार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने जलद गतीने करण्यात आल्याचे कागदपत्रांवरून आढळते.‘अधिकाऱ्यांचे संगनमत’एखाद्या भूसंपादनाची अधिसूचना काढल्यानंतर त्या भागांत याबाबत जनजागृती करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासकीय यंत्रणेची असते. मात्र, पनवेल प्रांत कार्यालयाने कोणत्याही प्रकारची जनजागृती केली नाही. उलट स्थानिक लोकप्रतिनिधींनाही याचा थांगपत्ता लागू दिला नाही, असा आरोप भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे नेते काशिनाथ पाटील यांनी केला. टाळेबंदीत सर्व शासकीय यंत्रणा करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यरत असताना नव्याने लाभार्थी बनलेल्यांच्या नावे सातबारा फिरवण्यात महसूल विभागातील काही अधिकारी गुंतले होते, असा आरोप पाटील यांनी केला. ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली ते सर्व व्यवहार रद्द करून या प्रकरणात गुंतलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई न केल्यास पुन्हा असे प्रकार घडतील, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.एका महिन्यात २१ लाखांचे चार कोटीया प्रकल्पासाठी भूसंपादनाचे सर्वेक्षण जुलै २०१९मध्ये झाले. त्यावेळी जमिनीचे मालक आणि क्षेत्रफळ हा तपशील सरकारी कार्यालयाने जमा केला.

# लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक सुखाची देवाणघेवाण करणे हा बलात्काराचा गुन्हा नसावा. डॉ. राजन माकणीकर



तरुण-तरुणी शारीरिक आकर्षणा पोटी एकत्र येतात आणि कालांतराने ते दुरावले जातात, तेंव्हा आकसापोटी तरुणी त्या तरुणावर बलात्काराचा आरोप करते त्यामुळे त्या तरुणाचे संपूर्ण भविष्य धोक्यात येतें असे मत डेमोक्रॅटिक रिपाइंचे राष्ट्रीय महासचिव डॉ.राजन माकणीकर यांनी व्यक्त केले. बऱ्याच बाग बगीचा व लव्हर्स पॉईंट वर तरुण आणि तरुणी एकमेकांच्या कवेत चुंबन घेत असलेले पाहण्यात येते, काही दिवसाने या प्रकारामुळे त्यांच्यात वासना जन्म घेते व ते एकमेकांच्या शारीरिक भुकेला बळी पडतात प्रसंगी संभोगाचे अर्धवट ज्ञान असल्यामुळे तरुणी गर्भवती होते, काहींचे आपकार होतात तर काहींना गर्भ खाली करावा लागतो, तर तरुणी व तरुण सुद्धा आत्महत्येकडे प्रवृत्त होतात तर काही शारीरिक व्याधिंनी बळावतात. आलिंगन पर्यंत ठीक आहे किंतु सार्वजनिक ठिकाणी ही जोडपी एकत्र बसून स्वतः मधली वासना जागृत करतात आणि लोजिंग बोर्डिंग मध्ये वासनांध शरीर एकत्र येऊन शमतात. तरुणी गर्भवती झाली की ती लग्नासाठी मागे लागते, तरुणाला शरीर सुख पाहिजे म्हणून तो खोटी आश्वासने व आणाभाका घेऊन शरीर सुखाचा आनंद घेतही असेल परंतु, तरुण लग्नासाठी तयार असला तरी तरुणी लग्नासाठी नकार देते असेंही प्रकार दिसून येतात. वास्तविक आणाभाका दोघेही घेतात, यौन आणि लैंगिक सुख दोघांनी उपभोगलेले असते परंतु काही कालांतराने त्यांच्यात दुरावा निर्माण होतो आणि मन दुभंगली जातात, बऱ्याच प्रकरणात लग्ना नंतर जे पाहिजे असत ते आधीच मिळाल्यामुळे त्या नात्यात ते पवित्र्ये आनि आकर्षण नसते आणि घेतलेल्या आणाभाका तुडविल्या जातात. आंतरजातीय प्रेम संबंध किंवा शारीरिक आकर्षणातून निर्माण झालेले संबंध किंवा फक्त वासनेतून निर्माण झालेले संबंधात तृष्णा पूर्ण झाल्यास किंवा बिकट अथवा अवघड परिस्तिथीमुळे लग्न बंधनात अडकता येत नाही या सर्व प्रकारात जबाबदार दोघेही समप्रमानात असतात. मात्र बहुतांश वेळी या प्रकरणाला स्वतःच्या मर्जीने झालेल्या एक वेळच्या किंवा अनेक वेळच्या संभोगाला बलात्काराचे नाव देऊन तरुणावर आरोप केला जातो आणि त्या तरुणाचे संपूर्ण आयुष्य अंधकारमय होते. सांगायचे म्हणजे दोघेही तेवढेच जबाबदार असतांना केवळ एकालाच दोषी ठरवून शिक्षा का?यामुळे या कायद्यात संशोधन होऊन एक नविन कायदा अमलात आला पाहिजे जेणे करून या प्रकरणामधील "बळी का बकरा" तरुणाला कायद्याने संरक्षित करता येईल. कॅ. श्रावण गायकवाड यांच्या देखरेखीखाली समिती गठीत करून समाजसेवक, कायदे अध्यासक, महाविद्यालयीन विध्यार्थी विद्यार्थिनी, व पालक यांच्या प्रतिक्रिया मागविण्यात आल्याचेही माकणीकर यांनी सांगितले. एकंदरीत राजीखुषीने अन्यत्र रुम वर जाऊन सलग किंवा एकावेळी सहवास साधला म्हणजे तो बलात्कार ठरू नये खोटी अस्वासने व घेतलेल्या आणाभाका च ठराव्यात. याबद्दल कायदा पारित करण्यासाठी पक्ष प्रमुख कनिष्क कांबळे यांच्याशी चर्चा करून कॅ. श्रावण गायकवाड, विजय चव्हाण, राजेश पिल्ले, शिवाभाई राठोड, निरंजन दलाल, सय्येद मूनवर, आदींचे शिस्तमंडल कायदेमंत्री रविशंकर प्रसाद, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राज्यपालांशी भेटणार असून या प्रकरणी गंभीर चिंतन आणि मनन होणे गरजेचे असल्याचेही डॉ. माकणीकर म्हणाले.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रभाग कार्यालय क्र.१**

जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/आर २८/१११३/२०२०-२१ दिनांक :-२६/११/२०२०

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील राई मुर्धे विभागातील झोन क्र आर०३, येथील मालमत्ता क्रमांक **आर०३००१७६०७००२,** सदानिका क्र.२, असून पत्ता मोर्वा गाव भाईंदर (प.) या घरास सन-२०२०-२१ मध्ये **श्री वामन दामोदर राउत** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **मुलगे** या नात्याने **श्री नितीन, दर्शन, विनोद वामन राउत** यांनी दिनांक: २१/०९/२०२० रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - श्री प्रभाकर म्हात्रे यांचे घर
पश्चिमेस - श्री दामोदर पाटील यांचे घर
दक्षिणेस - श्री जयंतीबाई राउत यांचे घर
उत्तरेस - धनाजी राउत यांचे घर

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका


## पृष्ठ १ वरुन

### ठाकरे सरकारने घेतला

सर्वोच्च न्यायालयातील याचिकेवर याचा परिणाम होऊ शकतो अशी भीती आरोग्य विभागातील वरिष्ठ डॉक्टरांनी व्यक्त केली.

आरोग्य विभागाने २१ मे २०२० रोजी राजी केलेल्या आदेशानुसार खासगी रुग्णालयांना बेडसाठी ४००० रुपये, अति-दक्षता विभागातील बेडसाठी ७५०० तर व्हेंटिलेटर बेडसाठी ९००० दर निश्चित करण्यात आला. त्याचबरोबर विविध आजार व शस्त्रक्रिया यासाठीचे दरही निश्चित करण्यात आले होते. यातील महत्वाची बाब म्हणजे ज्या रुग्णालयांना रुग्णांसाठी विमा कंपन्यांकडून जे दर दिले जातात त्यापेक्षा जास्त दर आकारण्याला बंदी घालण्यात आली. मात्र या आदेशालाही बहुतेक रुग्णालयांनी केराची टोपली दाखवली तर मुंबईतील काही पंचतारांकित रुग्णालयातून या आदेशातून मार्ग काढत पीपीइ किट, औषधांसाठी, प्रशासकीय बाब आदी अन्य मार्गाने अव्वाच्या सवा दर आकारल्याचे उघड झाले. याविरोधात कारवाई करायचे आदेश आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी देऊनही हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच खासगी रुग्णालयांवर गुन्हे दाखल केले गेले.ज्यावेळी म्हणजे २१ मे रोजी सरकारने रुग्णांची लूटमार रोखण्यासाठी बेडचे दर व उपचारांचे दर निश्चित करणारा आदेश जारी केला त्यावेळी राज्यात दररोज साडेचार ते पाच हजार करोना रुग्ण आढळायचे व आताही रोज साडेपाच हजार रुग्ण आढळत असून १५ डिसेंबर ते जानेवारी अखेरच्या काळात करोनाची दुसरी लाट येण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे किमान तीन महिन्यांसाठी या आदेशाला मुदतवाढ मिळणे गरजेचे असताना सरकारने केवळ १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देऊन खासगी रुग्णालयापुढे शरणागती पत्करल्याचे आरोग्य विभागातील डॉक्टरांचे म्हणणे आहे. यापूर्वीही खासगी रुग्णालयांचे ८० टक्के बेड ताब्यात घेण्याचा आदेश काढताना खाजगी रुग्णालयांनी विरोध केल्यामुळे तेव्हाआदेश निघण्यास वेळ लागला होता असा आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी केला आहे. विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी तीन महिन्यापूर्वी खासगी रुग्णालयांच्या मनमानी बिल आकारणीची व केलेल्या कारवाईची माहिती राज्यातील सर्व महापालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे मागितली होती. मात्र आजही अशी एकत्रित कारवाईची माहिती आरोग्य विभागाकडे नाही.

### कोरोनामुळे 10वी आणि 12वीच्या परीक्षा उशिरा होणार

देखील विस्कटली आहे. तर दुसरीकडे भारतात कोरोनाची दुसरी लाट येण्याचे संकेत देखील प्रशाकनाकडून देण्यात आले आहेत. याचा सर्वात मोठा फटका शिक्षण व्यवस्थेला बसत आहे. सध्या देशात ऑनलाईनच्या माध्यमातून शिक्षणावर भर दिला जात आहे. तर ९ ते १२वी पर्यंतचे वर्ग सुरू करण्यास काही राज्यांमध्ये सुरूवात झाली आहे. अशात शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी कोरोनामुळे परीक्षाही उशिरा होणार असल्याचं जाहीर केलं. त्या म्हणाल्या की, कोरोनाची एकंदर परिस्थिती पाहता १० वी आणि १२वीच्या परिक्षा एप्रिल-मेमध्ये घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिवाय विद्यार्थ्यांवरील ताण कमी व्हावा म्हणून २५ टक्के अभ्यास क्रम कमी करण्यात येणार असल्याचं देखील त्यांनी सांगितलं. दरम्यान, काही राज्यांमध्ये शाळा सुरू करण्यात आल्या आहे, तर केंद्र सरकारने शाळा पुन्हा सुरू करण्याचे निर्णय राज्य सरकारवर सोपवले आहेत. कोरोनामुळे विद्यार्थ्यांचं देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

### टोलनाक्यांसाठी जकातनाक्यांच्या जमिनी?

जकातनाक्यांच्या जमिनी हस्तांतरित करण्याची मागणी पालिकेला केली आहे. टोलनाक्यांवर लागणाऱ्या लांबलचक रांगा टाळण्यासाठी, तसेच सर्व लेनमध्ये फास्टॅग सुविधा सुरू करण्यासाठी अधिक जागा आवश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे कळते आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे मुंबईच्या वेशीवरील पाच टोलनाक्यांची जबाबदारी आहे. या टोलनाक्यांवर होणारी गर्दी टाळण्यासाठी यापूर्वीच फास्टॅग सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. या सुविधेचा विस्तार करण्यासाठी या टोल नाक्यांजवळील बंद अवस्थेत असलेल्या जकातनाक्यांच्या जमिनी आपल्या अधिकारात घ्यायचा विचार महामंडळ करत आहे.

### 4 टन बेकायदेशीर जनावरांचे मांस भरलेला

आणले आहे का..?. या अगोदर पोलीसांनी अनेक ठिकाणी कारवाई केल्या आहेत. मात्र, याचा खरा तपास पोलीसांनी केला तर मोठ्या रॅकेटचा छडा लागेल, बेकायदेशीर मांस विक्री कत्तल करणे याचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेले आहे.या कारवाईत नयानगर पोलीसांनी अस्लम शेख, रहेमुद्दीन कुरेशी अशा दोन जणांविरोधात महाराष्ट्र पशुसंवर्धन सुधारित कायदा २०१५ चे कलम ५ क, ९ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई मीरा-भाईंदर वसई विरार परिमंडळ १ चे उपायुक्त अमित काळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी केली आहे.

### चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीला वाशी

आयुक्तालयातील इतर पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या मालमत्ता विषयीचे आणखीन गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.सदरची यशस्वी कामगिरी माननीय पोलीस आयुक्त श्री.बिपिन कुमार सिंह, माननीय पोलीस सहआयुक्त डॉ.जय जाधव, माननीय पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ वाशी नवी मुंबई श्री. सुरेश मेंगडे, माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.विनायक आ वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजीव धुमाळ पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद तोरडमल (गुन्हे)गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन ढगे व पथक यांनी यशस्वीपणे पार पाडली.

### मोबाईल हिसकावून चोरी करणारी टोळी गजाआड;

आली आहे.अटक आरोपी शरीफ सिद्धिकी यांच्याशी अधिक चौकशी करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील इतर पोलीस ठाण्यामध्ये दाखल असलेल्या मालमत्ते विषयीचे आणखीन गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.सदरची यशस्वी कामगिरी माननीय पोलीस आयुक्त श्री.बिपिन कुमार सिंह, माननीय पोलीस सहआयुक्त डॉ.जय जाधव, माननीय पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ वाशी नवी मुंबई श्री. सुरेश मेंगडे, माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.विनायक आ वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजीव धुमाळ पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद तोरडमल (गुन्हे)गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन ढगे तसेच बीट मार्शल वरील कर्मचारी पोलीस ना.सुनील पाटील, पोलीस ना.सतीश पाटील आणि पोलीस ना.परशुराम बिन्नर यांनी यशस्वीपणे पार पाडली

### मुंबईनगरीला ड्रग्स माफियांचा विळखा,

त्यांच्यावर एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये 4 कोटी 23 लाख रुपयांचे ड्रग्स हस्तगत केले आहे. मुंबईत अरबो खरबो रुपयांच्या अंमली पदार्थांची उलाढाल झाली आहे. फक्त गेल्या 10 वर्षात मुंबईतून 100 कोटी रुपयांपेक्षा जास्तीच्या ड्रग्सची तस्करी करताना ड्रग्स जप्त केले गेले आहे.

### अभिनेत्रीला लग्नाचं आमिष दाखवून दोन

दाखवत तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याचं या अभिनेत्रीने दाखल केलेल्या तक्रारीत म्हटल्याचं ‘न्यूज18’च्या वृत्तात नमूद करण्यात आलं आहे.लग्नाचं आमिष दाखवून आयुषने पीडित अभिनेत्रीवर वारंवार बलात्कार केला. त्यानंतर पीडिता गर्भवती राहिली. मात्र, आयुषने तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. त्यामुळे या अभिनेत्रीने पोलिसांकडे धाव घेत आयुषविरोधात तक्रार दाखल केली आहे. २५ नोव्हेंबर रोजी वर्सोवा पोलीस ठाण्यात आयुष विरोधात तक्रार दाखल झाली असून त्याच्यावर कलम ३७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणी तपास सुरु आहे. दरम्यान, आयुषने या पीडित अभिनेत्रीला लग्नाचं आमिष दाखवून तिच्यावर दोन वर्ष बलात्कार केला. मात्र, ऐनवेळी त्याने लग्न करण्यास नकार दिला, अशी माहिती वर्सोवा पोलीस ठाण्यातील एका पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. या अभिनेत्री काही वेब सीरिजमध्ये काम केलं असून या घटनेनंतर कलाविश्वात पुन्हा एक खळबळ उडाल्याचं सांगण्यात येत आहे.

### करोना संसर्ग रोखण्यासाठी मुखपट्टीचा वापर आवश्यक आहे.

रुपये दंड वसूल करण्यात येतो. मुंबईतील सर्व २४ विभाग कार्यालयांच्या हद्दीत मुखपट्टीविना वावरणाऱ्या नागरिकांवर अधिकाधिक कारवाई करण्याचे निर्देश पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी दिले होते. मात्र तरीही अनेक नागरिक मुखपट्टी न लावता किंवा मुखपट्टी हनुवटीवर ओढून फिरतात. अशा लोकांकडून दंड वसूल केला जातो. त्यांना मुखपट्टीची आवश्यकतादेखील समजावून सांगितली जाते. दंड केल्यानंतर नागरिक पुन्हा मुखपट्टी न लावता पुढे जातात. त्यामुळे मुखपट्टी वापराच्या मूळ उद्दिष्टांची पूर्तता व्हावी, यासाठी दंड करण्यासोबत संबंधित नागरिकास एक मुखपट्टीदेखील मुंबई महानगरपालिकेकडून मोफत पुरविली जाणार आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ डिसेंबर-२०२०



## संपादकीय...



### तर लाखभर शेतकऱ्यांनी दिल्लीपर्यंत यायचे कारणच काय?; शेतकरी आंदोलनाचा तिढा

केंद्र सरकारने सप्टेंबर महिन्यात मंजूर केलेल्या तीन कृषी विधेयकांच्या विरोधात उत्तर भारताच्या काही राज्यांतील शेतकऱ्यांनी सुरू केलेला संघर्ष आता राजधानी दिल्लीच्या सीमेवर येऊन ठेपला आहे. पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि उत्तराखंडमधील सुमारे एक लाख शेतकरी दिल्लीच्या तीन सीमांवर थडकले आहेत. महाराष्ट्रातूनही काहीजण गेले आहेत. त्यांना पोलिसांद्वारे आधी सीमांवर अडवण्यात आले. त्यांनी दिल्लीत शिरू नये, यासाठी बॅरिकेड्स लावले, ते तोडून पुढे कूच करणाऱ्या शेतकऱ्यांवर पाण्याचा मारा करण्यात आला, लाठीमार आणि अश्रुधुराचाही वापर पोलिसांनी केला. तरीही शेतकरी ना डगमगता सीमेवर ठाण मांडून बसले आहेत. ट्रक, ट्रॅक्टरमधून तसेच चालत आलेल्या या शेतकऱ्यांमध्ये महिला, वृद्ध आणि काही लहान मुलेही सहभागी आहेत. शेतकरी आंदोलन मागे



घ्यायला तयार नाहीत हे पाहून कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी त्यांना ३ डिसेंबर रोजी चर्चेला येण्याचे निमंत्रण दिले. तुम्ही दिल्लीत एकाच जागी या, त्यानंतर वाटल्यास लगेच चर्चा सुरू करू, तुमचे म्हणणे ऐकून घ्यायला केंद्र सरकार तयार आहे, अशी घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केली; पण सरकार अटी, शर्ती घालून चर्चेसाठी बोलावत आहे, असे म्हणून शेतकरी संघटनांनी बोलणी करण्यासाठी जाण्याचा प्रस्ताव धुडकावून लावला आहे. त्यामुळे या आंदोलनातून प्रश्न सुटण्याऐवजी तिढा वाढण्याचीच शक्यता निर्माण झाली आहे. केंद्र सरकारने कृषी कायद्यांबाबत या शेतकऱ्यांशी चर्चा करण्याचे टाळले, हेही तिढा वाढण्याचे प्रमुख कारण आहे. या तिन्ही विधेयकांना जवळपास सर्व विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता. या कायद्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त केली होती; पण सरकारने बहुमताने ती विधेयके संमत करवून घेतली. शिवाय त्यात किमान आधार भावाचा उल्लेख नसल्याने शेतकरी अधिक संतप्त झाले. शेतकऱ्यांचे नुकसान व्हावे, त्यांचे उत्पन्न वाढू नये, अशी केंद्राची भूमिका नसली तरी या कायद्यांबाबतचे समज वा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न न केल्यामुळेच लाखभर शेतकरी दिल्लीपाशी येऊन उभे आहेत.एवढे मोठे आंदोलन सुरू होण्याआधीच केंद्राने सामंजस्याची भूमिका घेऊन चर्चा सुरू केली असती तर आजची स्थिती आली नसती. याआधी पंजाबच्या शेतकऱ्यांनी एक महिनाभर रेल रोको आंदोलन केले, त्यामुळे शेकडो गाड्या रद्द कराव्या लागल्या, काहींचे मार्ग बदलावे लागले. रेल्वेला काही कोटींचा तोटा सहन करावा लागला. काँग्रेसची सत्ता असलेल्या पंजाबसह अनेक राज्यांनी केंद्रीय कायदा लागू न करण्याचा ठराव विधानसभेत संमतही केला. पण मूळ कायदा रद्द करा वा त्यात काही बदल करा, किमान आधार भावाचा उल्लेख त्यात करा, बाजार समित्यांचे अस्तित्व संपवू नका, अशा मागण्यांवर शेतकरी ठाम आहेत. ते दिल्लीत धडकण्याआधी चर्चा सुरू झाली असती, तर हा प्रश्न चिघळला नसता. दिल्लीच्या वेशीवर पोहोचायचे आणि तिथे आल्यानंतर सरकारशी चर्चा करायची नाही, ही शेतकरी संघटनांनी घेतलेली भूमिकाही योग्य नाही. चर्चा करायचीच नव्हती तर लाखभर शेतकऱ्यांनी दिल्लीपर्यंत यायचे कारणच काय? आंदोलनाद्वारे आपली ताकद दाखवायची असते हे खरेच, त्यामुळे प्रशासन वा सरकार चर्चेला तरी तयार होते. अशावेळी चर्चेने प्रश्न सुटू शकतात; न सुटल्यास पुन्हा संघर्ष आणि आंदोलन हे मार्ग असतातच. लोकशाही मार्गामध्ये संवाद, चर्चा हीच महत्त्वाची साधने आहेत, हे शेतकरी आणि केंद्र सरकार यांनी विसरून चालणार नाही. आतापर्यंत चर्चेला तयार नसलेले केंद्र सरकार आता स्वतःहून बोलणी करायला बोलावते आहे, हाही महत्त्वाचा टप्पा आहे. त्या निमंत्रणाचा शेतकऱ्यांनी उपयोग करून घ्यायला हवा. शेतकऱ्यांना दिल्लीच्या वेशीवर किती काळ बसवून ठेवायचे, हा विचार त्यांच्या नेत्यांनी करायला हवा. नेत्यांनी हे आंदोलन व्यवस्थित हाताळले, त्यातून शेतकऱ्यांच्या मागण्यांचा योग्य विचार झाला आणि सरकारलाही शेतकऱ्यांचा कळवळा सिद्ध करता आला, तर त्यात फायदा सगळ्यांचाच आहे. त्यादृष्टीने विचार व्हायला हवा. अन्यथा, आंदोलन दडपले जाईल, त्यात फूट पडेल वा ते नेत्यांच्या हातात राहणार नाही. समाजकंटक त्याचा गैरफायदा घेतील आणि नुकसान मात्र शेतकऱ्यांचे होईल. आधीच पंजाबच्या आंदोलनकारी शेतकऱ्यांवर खलिस्तानी असा ठपका ठेवण्याचा प्रयत्न काही सत्ताधारी नेत्यांनी केला आहे. तसे म्हणणे चुकीचेच; पण सत्ताधाऱ्यांकडे साम, दाम, दंड, भेद हेही मार्ग असतात, हे शेतकरी आणि त्यांच्या नेत्यांनी विसरून चालणार नाही.",

# सर्वपक्ष समभाव!

## सहकारी बँकांच्या भागधारकांना देय लाभांश व त्यांच्या समभाग गुंतवणूक परताव्याबाबतचा ताजा निर्णय तर या क्षेत्रासाठी कमालीचा अन्यायकारक असूनही, त्यात बदल झालेला नाही..

काँग्रेस आमच्या शहरास सापत्नभावाची वागणूक देते. आमच्या विचारांचे राज्य सरकार आले तरच आमचे शहर सुधारेल,'' असे जाहीर विधान भाजपच्या एका नेत्याने २०१४ सालच्या विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर 'लोकसत्ता'च्या व्यासपीठावर केले होते. त्याप्रमाणे त्यांच्या 'विचारा'चे सरकार आले. परंतु प्रत्यक्षात घडले ते असे की, सदर शहर होते त्यापेक्षा अधिक बकाल आणि भिकार तर झालेच, पण दरम्यानच्या काळात काँग्रेस विचारांचे अनेक नेते भाजपमध्ये दाखल झाले. म्हणजे ज्या नेतृत्वामुळे आपला विकास होत नाही, असा ग्रह सदरहू भाजप नेत्याने सोयीस्करपणे करून घेतला होता ते काँग्रेसी नेते भगवी उपरणी लेवून भाजपवासी झाले. परिणामी 'आमच्या विचारां'च्या सरकारवर आशा लावून बसलेले सदर नेते सांप्रतकाळी या नव-भाजपवासी नेत्यांच्या कार्यक्रमांत आपल्या परंपरागत सतरंज्या घालण्या-उचलण्याच्या कार्यात मग्न दिसतात. कोणत्याही किमान वास्तववादी विचारी गृहस्थास पटू शकेल असा हा दाखला नव्याने देण्याची गरज म्हणजे राज्यातील नागरी सहकारी बँकांची रिझर्व्ह बँकेकडून सुरू असलेली मुस्कटदाबी. ती काँग्रेसच्या काळात होत होतीच. आता ती अधिक निर्घृणपणे होते. नागरी सहकारी बँकांना भाजपच्या काळात चांगले दिवस येतील अशी भाबडी आशा बाळगणारे अजूनही रिझर्व्ह बँकेकडे डोळे लावून असले तरी प्रत्यक्ष घटना याच्या उलट घडताना दिसतात. त्या समजावून घेण्याआधी नागरी सहकारी बँका आणि भाजप वा हिंदुत्ववादी विचार यांचे नाते समजून घेणे आवश्यक आहे.





गांधीहत्येनंतर ब्राह्मण समाजातील व्यक्ती, संस्था यांना तत्कालीन बँकांकडून पतपुरवठा अधिकाधिक अवघड झाल्याची अस्वस्थता पसरली. त्यामागच्या कारणांची चर्चा येथे अप्रस्तुत. परंतु या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी या समाजातील धडपडय़ा आणि द्रष्टय़ा व्यक्तींनी आपल्यासाठी स्वतंत्र बँका स्थापण्याचा घाट घातला आणि त्यातून महाराष्ट्रात सशक्त अशी नागरी सहकारी बँक चळवळ उभी राहिली. ग्रामीण वा जिल्हा सहकारी बँकांवर काँग्रेस, आणि आता राष्ट्रवादी, यांचा पारंपरिक प्रभाव होता. त्यातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, दूध संघ, अन्य उद्योग यांची साखळी उभी राहिली. म्हणून ग्रामीण, जिल्हा सहकारी बँका काँग्रेसी विचारांच्या ताब्यात, तर नागरी सहकारी बँकांवर रा. स्व. संघाचा प्रभाव अशी ही वाटणी. हे असे असले तरी एक मुद्दा नि:संकोचपणे मान्य करायला हवा. तो म्हणजे या नागरी सहकारी बँकांची अत्यंत प्रभावशाली कामगिरी. संघीय विचारांतील व्यक्तींनी या बँका अत्यंत चोखपणे आणि व्यवसायस्नेही दृष्टिकोन बाळगून चालवल्या. त्यांच्यातील मूळ अभ्यासू वृत्तीचा पुरावा या बँकांच्या वार्षिक अहवाल व ताळेबंद आदींतून मिळेल. या क्षेत्राची ताकद, महत्त्व आणि समाजातील विविध स्तरांत पोहोचण्याची क्षमता ओळखून रा. स्व. संघाच्या मुशीतून घडलेल्यांनी 'सहकार भारती' नावाची स्वतंत्र संघटनादेखील स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून नागरी सहकारी बँकांना भेडसावणारे अनेक प्रश्न हाताळले गेले. यांतील काही समस्यांचे निराकरण तर काँग्रेस सरकारांनीदेखील तत्परतेने केले.

त्याचमुळे नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर नागरी सहकारी बँकांच्या समस्यांकडे सत्वर लक्ष दिले जाईल, अशी आशा या क्षेत्रातील अनेकांना होती. प्रत्यक्षात आहेत त्या समस्या सोडवणे दूरच; पण या क्षेत्रापुढे या काळात नव्याने अनेक अडचणी निर्माण होताना दिसतात. उघडपणे या संदर्भात भाष्य करणे यांपैकी अनेकांना जड जाईल हे वास्तव लक्षात घेतले तरी त्यातील काही घटना कटू सत्यनिदर्शक आहेत. उदाहरणार्थ, माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या कानांवर नागरी सहकारी बँकांचे प्रश्न घालून त्यांनी त्यात हस्तक्षेप करावा असा प्रयत्न अनेकदा झाला. नितीन गडकरी यांच्यासारख्या धडाडीच्या नेत्यानेही त्यासाठी प्रयत्न केले. त्याचा परिणाम काय हे सांगण्याची गरज नाही. त्यानंतरच्या विद्यमान अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या अत्यंत महत्त्वाच्या सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी आपला अमूल्य वेळ किती दिला, हा तर संशोधनाचा विषय. सत्ताधाऱ्यांचेच या विषयाकडे दुर्लक्ष असल्याने रिझर्व्ह बँक या क्षेत्रास हिंग लावून विचारत नाही. या काळात सहकार चळवळीशी सातत्याने कार्यरत असलेले संबंधित रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळावर नेमले गेले हे खरे. इतका मान या क्षेत्रास पहिल्यांदाच दिला गेला, हेही खरे. पण ते तितकेच. केवळ नावापुरते. प्रत्यक्षात रिझर्व्ह बँक नागरी सहकारी बँकांना 'सब घोडे बारा टके' अशीच वागणूक देते. सरकार बदलले म्हणून रिझर्व्ह बँकेच्या सहकारविषयक धोरणांत काडीचीही सुधारणा नाही. या बँकांची परिस्थिती उत्तरोत्तर किती बिकट होत चालली आहे याचे सविस्तर वृत्तांत 'लोकसत्ता'ने गेल्या आठवडय़ात दोन वेळा प्रसिद्ध केले.

करोनाकाळ आणि नंतर एकूणच अर्थविश्वावर आलेले गंडांतर यामुळे या बँकांसमोरील अडचणींत चांगलीच वाढ झाली. अशा वेळी या क्षेत्राच्या जखमांवर फुंकर घालण्याऐवजी रिझर्व्ह बँक अत्यंत अमानुषपणे या क्षेत्राच्या वेदनाच वाढवताना दिसते. बरे, या बँका आकाराने लहान आहेत म्हणून त्याकडे रिझर्व्ह बँकेचे दुर्लक्ष होते म्हणावे तर तसेही नाही. लक्ष्मी विलास वा येस बँक यांच्याविषयी निर्णयांची लगबग दाखवणारी रिझर्व्ह बँक नागरी सहकारी बँकांबाबत मात्र ढिम्म; हे कसे? उच्चभ्रूंच्या वित्तसंस्था नुसत्या कण्हल्या तरी उपायांची सत्वरता दाखवणाऱ्या रिझर्व्ह बँकेस मध्यमवर्गीयांच्या सहकारी बँकांनी टाहो फोडला तरी त्यांची कणव येत नाही, यास काय म्हणणार? आत्मनिर्भरतेचा गजर सुरू असताना आपलेच नियम, संकेत खुंटीला टांगून रिझर्व्ह बँक 'लक्ष्मी विलास बँके'स बुडावे लागू नये म्हणून कसलीही चाड न बाळगता अलगदपणे चिनी मालकी असलेल्या सिंगापूरच्या बँकेच्या पदरात घालते. पण 'पंजाब ॲण्ड महाराष्ट्र' सहकारी बँक बुडाली तरी त्याबाबत, तिच्या ठेवीदार, गुंतवणूकदारांबाबत रिझर्व्ह बँकेचे हृदय द्रवत नाही, याचा अर्थ कसा लावणार?

हे सर्व घडत असताना रिझर्व्ह बँकेच्या सल्लागार मंडळात सहकार क्षेत्राशी संबंधित मान्यवरांना निर्णय प्रक्रियेत किती मान आणि स्थान दिले जाते हे यावरून लक्षात येते. सहकारी बँकांच्या भागधारकांना देय लाभांश आणि त्यांच्या समभाग गुंतवणूक परताव्याबाबतचा ताजा निर्णय तर या क्षेत्रासाठी कमालीचा अन्यायकारक आहे. आता त्यास सहा महिने होतील. पण आपल्या या निर्णयात बदल वा सुधारणा करण्याचे साधे सौजन्य रिझर्व्ह बँकेने दाखवलेले नाही. मध्यमवर्गीयांतील अनेक कुटुंबे आपुलकीच्या नात्याने सहकारी बँकांचे समभाग खरेदी करतात. त्यांची पुरती कोंडी रिझर्व्ह बँकेच्या निर्णयामुळे झाली असताना त्याची दखलदेखील घेतली जाऊ नये हे अधिक संतापजनक ठरते.

अशा वेळी या सहकारी बँकिंगशी संबंधित धुरीणांनी पक्षीय भेदाभेद बाजूस ठेवून या क्षेत्राविषयी ममत्व असणाऱ्या सर्वपक्षीय राजकारण्यांची आघाडी निर्माण करावी आणि थेट पंतप्रधानांना यासाठी साकडे घालावे. रिझर्व्ह बँक फक्त त्यांचेच ऐकते, हे वारंवार दिसले आहे. बाकी सर्व डोलारा किती पोकळ आहे इतकी जरी जाणीव संबंधितांना झाली असेल आणि त्याची (मनातल्या मनात का असेना) कबुली देण्याइतका प्रामाणिकपणा असेल, तर या समस्या सोडवण्यासाठी काही प्रामाणिक प्रयत्न होतील. अन्यथा या क्षेत्राची अवस्थाही सुरुवातीस उद्धृत केलेल्या शहराप्रमाणेच होईल, हे निश्चित. सामान्यांच्या मूलभूत समस्या सोडवण्यातील सर्वपक्ष समभाव मान्य करण्यात प्रागतिक शहाणपण आहे. म्हणून अर्थविचार हा पक्षनिरपेक्षच हवा. सहकारी बँक क्षेत्रास तरी आता याची जाणीव होत असेल.

# नामांकित महाविद्यालयांत प्रवेशासाठी चुरस



राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नामांकित महाविद्यालयांमध्ये यंदा प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा आहे. तरीही अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मोठय़ा प्रमाणावर जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमधील प्रवेशाची अटीतटीची स्पर्धा यंदाही वाढतीच आहे.

राज्यातील महाविद्यालयांमधील अभियांत्रिकी, औषधनिर्माण, कृषी अभ्यासक्रमासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेचा निकाल शनिवारी रात्री उशीरा जाहीर झाला. यंदा शंभर पर्सेटाईल म्हणेज सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे.

अभियांत्रिकीच्या प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येणाऱ्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (पीसीएम) या विषय गटाची परीक्षा देणाऱ्या २२ विद्यार्थ्यांना १०० पर्सेटाईल मिळाले आहेत. त्याशिवाय ८५ ते १०० पर्सेटाईल मिळवणारे २६ हजार ५०२ विद्यार्थी आहेत. त्यामुळे नामांकित महाविद्यालयांतील प्रवेशासाठी स्पर्धा वाढणार असल्याचे दिसत आहे.

औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येणाऱ्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (पीसीबी) या विषय गटात सर्वोत्तम म्हणजे १०० पर्सेटाईल मिळवणारे १९ विद्यार्थी आहेत. त्यामुळे मुळातच गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांची मागणी वाढत असलेल्या या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची स्पर्धा यंदा वाढण्याची शक्यता आहे.

औषधनिर्माण प्रवेशस्पर्धा शिगेला

गेल्या काही वर्षांपासून औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील प्रवेशासाठीची स्पर्धा शिगेला पोहोचली आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत एकूण पात्र विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली असली तरी साधारण २५ हजार जागांसाठी २ लाखांहून अधिक विद्यार्थी प्रवेशाच्या स्पर्धेत आहेत. त्यात ८५ पेक्षा अधिक पर्सेटाईल मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३२ हजार सातशे आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालयांतील जागा यंदाही रिक्तच?

यंदा प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली असली तरी त्यातील प्रत्यक्ष परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे. गेल्या वर्षी राज्यातील साधारण ५६ हजार जागा रिक्त राहिल्या होत्या. यंदा परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्याही जवळपास १ लाखांनी घटल्याचे दिसत आहे. अभियांत्रिकी शाखेसाठी यंदा १ लाख ७४ हजार ६७९ विद्यार्थी बसले होते. राज्यात अभियांत्रिकीच्या साधारण १ लाख २० हजार जागा उपलब्ध आहेत. यंदा मुळातच प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू होत आहे. सध्या विद्यार्थ्यांनी इतर विषयांना प्रवेश घेतला आहे. जवळपास एका सत्राचा कालावधी प्रवेशोत्सुक विद्यार्थी दुसऱ्या विद्याशाखेतील शिक्षण घेत आहेत. त्याचा फटका महाविद्यालयांना बसण्याची शक्यता प्राचार्यांनी व्यक्त केली. प्रवेश परीक्षेत चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.

त्यामुळे नामांकित महाविद्यालयांतील प्रवेशासाठी स्पर्धा असली तरी मधल्या फळीतील आणि तळातील महाविद्यालयांना यंदाही विद्यार्थी शोधावे लागणार असल्याचे दिसत आहे.

# पदवीधर, शिक्षक मतदारसंघातील निवडणूक जातीय वळणावर



विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांमध्ये येत्या मंगळवारी होणाऱ्या निवडणुकीचा प्रचार रविवारी संपला. पाचही मतदारसंघांमध्ये सत्ताधारी महाविकास आघाडी आणि भाजपमध्ये चुरशीच्या लढती होत असून, ही निवडणूक जातीय वळणावर अधिक गेली. पुणे पदवीधर आणि शिक्षक, नागपूर पदवीधर, औरंगाबाद पदवीधर व अमरावती शिक्षक या पाच मतदारसंघांमध्ये मंगळवारी मतदान होत आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील निवडणुका या संघटना पातळीवर लढविल्या जात असत; परंतु अलीकडे राजकीय पक्षांनी या निवडणुकांमध्ये अधिक रस घेतला. शिक्षक मतदारसंघांमध्ये शिक्षक संघटनांचे उमेदवार असत. या वेळी मात्र शिक्षक मतदारसंघांमध्येही राजकीय पक्षांचे उमेदवार रिंगणात आहेत. नागपूर आणि औरंगाबाद या पदवीधर मतदारसंघांमध्ये प्रचार हा जातीय वळणावर अधिक गेला. नागपूरमध्ये भाजपचे संदीप जोशी विरुद्ध काँग्रेसचे अभिजित वंजारी यांच्यात लढत होत आहे. नागपूर पदवीधर हा मतदारसंघ भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जात असल तरी या वेळी काँग्रेसने अधिक जोर लावला. यामुळे भाजपलाही सारी ताकद पणाला लावावी लागली. औरंगाबादमध्ये माजी आमदार सतीश चव्हाण व भाजपचे शिरीष बोराळकर यांच्यात लढत होत असून, मराठवाडय़ात नेहमीप्रमाणेच प्रचार हा जातीय वळणावर अधिक गेला होता. पुणे पदवीधरमध्ये भाजपचे संग्राम देशमुख विरुद्ध राष्ट्रवादीचे अरुण लाड यांच्यात चुरशीची लढत होत आहे. ही जागा कायम राखण्याकरिता भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांनी सारी ताकद पणाला लावली. ही जागा भाजप कायम राखेल, असा ठाम विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त के ला. दुसरीकडे राष्ट्रवादीने आपली सारी यंत्रणा या निवडणुकीत उतरविली आहे.

# शेतकरी काय दहशतवादी आहेत का? संजय राऊत मोदी सरकारवर संतापले...



आणखी एक रात्र थंडीत काढल्यानंतर हजारो शेतकऱ्यांनी सलग चौथ्या दिवशी रविवारी केंद्राच्या नव्या शेतकी कायद्यांच्या विरोधातील आंदोलन सुरूच ठेवले. दरम्यान शेतकऱ्यांविरोधात करण्यात आलेल्या कारवाईवरुन शिवसेना खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. शेतकरी काय दहशतवादी आहेत का ? अशी विचारणा संजय राऊत यांनी केली आहे. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

"जो शेतकरी तुमचा अन्नदाता आहे त्याला तुम्ही दहशतवादी, देशद्रोही म्हणत आहात. पंजाब, हरियाणामधील शेतकरी महाराष्ट्राप्रमाणे आहे. हा देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी ज्यांनी प्रयत्न केला, जी प्रमुख राज्यं आहेत त्यामध्ये महाराष्ट्र, पंजाब आणि हरियाणाचा समावेश आहे. शेतकरी काय दहशतवादी आहेत का?," असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या नव्या कृषी कायद्यांच्या विरोधात आमचे आंदोलन सुरूच राहणार असून आम्ही दिल्लीचे पाचही प्रवेशमार्ग बंद करू, असे गेले ४ दिवस दिल्लीच्या सीमांवर ठिय्या मांडून बसलेल्या शेतकऱ्यांनी रविवारी सांगितले. "पंजाबच्या शेतकऱ्यांनी जगासमोर आदर्श ठेवत शांततेत आंदोलन या देशाच्या इतिहासात कधी झालं नव्हतं. ज्याप्रकारे शेतकऱ्यांवर बळाचा वापर केला जातो हा बळाचा वापर जर चीनच्या सीमेवर केला असता तर लडाखमध्ये चीनचं सैन्य घुसलं नसतं," असा टोलाही संजय राऊत यांनी लगावला आहे. पुढे ते म्हणाले की, "सर्वांनीच शेतकऱ्यांना समर्थन दिलं पाहिजे.

## डिझेल चोरी करणाऱ्या टोळीचा छडा लावून केले जेरबंद



मुंबई ते पुणे असणारी HPCL कंपनीची पेट्रोलियम पाईपलाईनचे प्रेशर कमी येत असल्यामुळे HPCL कंपनीने सदर पाईप लाईन वर गस्त नेमली होती. सदर गस्ती दरम्यान दिनांक २७/९/२०२० रोजी पहाटे ३:०० वाजताच्या सुमारास तुर्भे ओव्हर विजे येथे पाईपलाईन च्या जवळ हालचाली दिसल्याचे कर्मचाऱ्यांना आढळून आले. त्यामुळे, त्यांनी सानपाडा पोलीस ठाणे येथे संपर्क साधला. यावरून सानपाडा पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक गुन्हे देशमुख व इतर पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तिथे जाऊन पोलीसांना पेट्रोलियम पाईपलाईनला छिद्र पाडून लोखंड वॉल बसून पेट्रोलियम पदार्थाची चोरी झाल्याचे दिसून आले.त्यावरून सानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर.१००/२०२० भारतीय दंड संहिता ३७९,२८५,४२७,४११,३४ सह पेट्रोलियम खनिज वाहकनळ कलम १५, सह सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ३, सह अत्यावश्यक वस्तू सेवा अधिनियमचे कलम ३,७(१)प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.दिनांक. १५/११/२०२० रोजी तांत्रिक तपासाद्वारे मिळालेल्या माहितीनुसार आणि सापळा लावून आरोपी नामे भोलाप्रसाद यादव याला शिताफीने ताब्यात घेण्यात आले व त्याला विश्वासात घेऊन त्याच्या साक्षीदाराचे नामे १)बलदेव सिंग २) जितेंद्र उर्फ जितूभाई यादव ३) केशव शेट्टी हे सानपाडा हायवे ब्रिज याठिकाणी येणार असल्याची माहिती दिल्याने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक. निकम पोलीस निरीक्षक गुन्हे. देशमुख पोलीस उपनिरीक्षक. कोळी व पथक यांनी सापळा लावून त्याच्या साक्षीदारांना शिताफीने ताब्यात घेतले.सदर आरोपीला सानपाडा पोलीस आणि इथे आणून अधिक चौकशी करण्यात आली. त्यांनी सदरचा गुन्हा इतर साक्षीदाराच्या मदतीने केला असल्याची कबुली दिली.त्यावरुन, सदर चारही आरोपी यांना अटक करण्यात आले.सदर गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या टॅकर, मोबाईल फोन व गुन्हा करताना वापरलेले साहित्य असा एकूण ३,२०,०००/-मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्ह्यातील चोरी केलेले डिझेल हे आरोपीने चिखली बुलढाणा येथे बायो डिझेल पंपाचे मॅनेजर सुरेश भास्कर सपकाळ यांना विकल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे, त्यांना बुलढाणा येथून ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आली आहे.सदरची कारवाई माननीय पोलीस आयुक्त श्री. बिपिन कुमार सिंग, माननीय सह पोलीस आयुक्त श्री. जय जाधव, माननीय पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ श्री. सुरेश मेंगडे आणि माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. भरत गाडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुभाष निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक. राहुल कोळी नेम सानपाडा पोलीस ठाणे हे गुन्ह्याचा पुढील अधिक तपास करीत आहेत.

## नवी मुंबईत घरफोडी करुन मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस; आरोपीला अटक

कोरोना काळात लॉकडाऊन शितील झाल्यामुळे नवी मुंबई परिसरात दिवसेंदिवस चोरीचा प्रकार वाढत आहे. चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी माननीय पोलीस आयुक्त. बिपिन कुमार सिंह, माननीय सहपोलीस आयुक्त. जय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय पोलीस उप आयुक्त. सुरेश मेंगडे परिमंडळ-१ वाशी व सह पोलीस आयुक्त. भरत गाडे.तुर्भे विभाग यांच्या आदेशाने माननीय वरिष्ठ पोलिस निरीक्षक. रवींद्र पाटील एन. आर. आय. सागरी पोलीस ठाणे यांनी गुन्हे प्रकटीकरण कक्षातील अधिकारी व अंमलदार पोलीस ठाणे हद्दीत गस्त करण्याचे आदेश दिले होते.एन.आर.आय सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक.३०९/२०२० भादविस कलम ३८०,४५७,४५४ प्रमाणे दिनांक. २०/११/२०२० रोजी चोरी गुन्ह्यातील फिर्यादीन त्याच्या घरातील दुरुस्तीसाठी ठेवलेले जुने ३४ मोबाईल हे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून



चोरी केले असावे, अशी तक्रार दाखल केली.सदर गुन्ह्याचा तपास एन.आर. आय व नेरूळ पोलीस ठाणे करत असताना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक तपासाच्या आधाराने रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार अक्षय मनवर नामक (वय२०) याला २१/११/२०२० रोजी ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यातील गेलेल्या संपूर्ण मुद्देमाल म्हणजे ३४ जुने वापरते मोबाईल जप्त करण्यात आले.सदर आरोपी अक्षय पवार याचे यापूर्वी एन.आर.आय. सागरी पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल झाले आहेत

## २४ तासात हत्येचा छडा लावून आरोपीला केले गजाआड



सानपाडा- एका तरुणावर शारीरिक मारहाण करून हत्या करण्यात आली. त्यानंतर आरोपी फरार झाला. याप्रकरणी सानपाडा पोलीस ठाण्यांनी अवघ्या चोवीस तासात कोणताही पुरावा नसताना हत्येचा छडा लावून आरोपीला अटक केली आहे.तरुणाने आरोपीकडून तंबाखू मागितल्यावर आरोपी “मी दुकानदार आहे का?” असे बोलल्याचा राग मनात धरून तरुणाने आरोपीला थप्पड व लाथ मारली. त्याचा राग आरोपीने मनात धरून तरुणाच्या डोक्यावर पाठीमागून लोखंडी चौकोनी पाईपने मारून खून केल्याची बाब उघड झाली आहे. रवी ओमकार शर्मा हे आरोपीचे नाव आहे.हकीकत अशी की, दिनांक १९/११/२०२० रोजी दुपारी ४:५०वाजता सुमारास पामबीच रोड वाशी रेल्वे वीजवर जखमी तरुण पडून असल्याची नियंत्रण कक्ष नवी मुंबई यांच्याकडून माहिती मिळाली. त्यामुळे सानपाडा पोलीसांनी तात्काळ कारवाई करून त्या तरुणास उपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये दाखल केले डोक्याला गंभीर जखम झाल्यामुळे अतिरक्तस्त्रावाने सदर तरुणाचे मृत्यू झाले. अकस्मात मृत्यू म्हणून दाखल झालेल्या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सखोल तपास करण्यात आला.सदर तरुणास आरोपी कडून लोखंडी चौकोनी पैठणी डोक्यावर पाठीमागून ठार करून त्याचा खून केल्याचे आढळून आले त्यानुसार, आरोपी रवी शर्मा विरुद्ध सानपाडा पोलीस ठाणे गु. रजि१२४/२०२० भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.सदरची धडाकेबाज कारवाई माननीय पोलीस आयुक्त श्री. बिपिन कुमार सिंह, माननीय सह पोलीस आयुक्त श्री. विजय जाधव, माननीय अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. वी.जी.शेखर पाटील , माननीय पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ श्री.सुरेश मेंगडे आणि माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.भरत गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुभाष निकम, पोलीस निरीक्षक श्री. बापूसाहेब देशमुख , सहाय्यक पोलीस निरीक्षक. निलेश राजपूत, पोलीस उपनिरीक्षक परशुराम भातुसे आधी पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी याकामी मेहनत घेतली.सदर होण्याचा पुढील अधिक तपास चालू आहे

## हेल्मेटअभावी २२१ दुचाकीचालकांनी गमावला जीव

कोल्हापूर : हेल्मेट असते तर...!!! पण हा विचार दुर्घटनेनंतरच मनात येतो. तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते अन् अपघातात जीव गमावलेला असतो. कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या १० महिन्यांत एकूण ४९२ अपघात घडले. त्यांमधील ४०० हून अधिक दुचाकी अपघातांत २२१ चालकांचा मृत्यू झाला. पैकी ९५ टक्के दुचाकी अपघातांत चालकाच्या डोक्यावर हेल्मेट नसल्याने त्याला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.डोक्याला हेल्मेट न घालता बहुतांश दुचाकीस्वार प्रवास करतात. दुचाकीचालकांनी व मागे बसलेल्या व्यक्तीने डोक्याला हेल्मेट घालणे कायद्याने सक्तीचे आहेच; पण त्याची तितक्या तीव्रतेने अंमलबजावणी होत नाही. वाहनचालकांनाही त्याचे गांभीर्य वाटत नाही.कोल्हापूर जिल्ह्यात या आठवड्यात



झालेल्या प्रत्येक दुर्घटनेत डोक्याला गंभीर दुखापत होऊन चालकाचा मृत्यू झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. कदाचित त्यांच्या डोक्याला हेल्मेट असते तर अपघातात ते जखमी झाले असते; पण त्यांच्यावर मृत्यूचे प्रसंग ओढवले नसते, असे दिसते.महामार्गांवर अपघातांची मोठी संख्यापुणे-बंगलोर या राष्ट्रीय महामार्गासह कोल्हापुरातून कोकणला जोडणारे तीन राज्य महामार्ग आहेत. या मार्गांवरही दुचाकीचालकांची मोठी वर्दळ आहे. या मार्गांवर दुचाकीचालकांना हेल्मेट वापरणे सक्तीचे असले तरीही त्याकडे पोलीस अथवा वाहनचालकांकडून गांभीर्याने पाहिले जात नाही; त्यामुळे या मार्गांवरच मोठ्या प्रमाणात दुचाकीस्वारांचे अपघात होतात.हेल्मेट नसल्यामुळे वाहन दुर्घटनेत बहुतांश २५ ते ३५ वयोगटातील तरुणांचे बळी गेलेल्यांची संख्या मोठी आहे, हेल्मेट न वापरणे म्हणजे आत्महत्या करण्याचाच प्रकार आहे. अपघातात अपंगत्व आले तरी केवळ हेल्मेट वापरल्याने डोके व जीवही सुरक्षित राहतो.- डॉ. वीरेंद्रसिंह पोवार,न्यूरो सर्जन, कोल्हापूर

## ठगांचे कर्दनकाळ नितीन नांदगावकरांच्या नावानेच महाठगाने वळविले लाखो रुपये!

शिवसेनेचे नेते नितीन नांदगावकर यांच्या नावाने मदतीचे आश्वासन देऊन एका व्यक्तीची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार अंधेरी परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंद होताच दोन भामट्यांना एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. रोहित हंबीराव कांबळे आणि सुरज शरद निकम अशी या दोघांची नावे असून अटकेनंतर या दोघांनाही अंधेरीतील लोकल कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली आहे.नेमके काय घडले? यातील तक्रारदार संदीप राजकुमार राजपूत हे अंधेरीतील मरोळ-मरोशी रोड, पीक व्हिलामध्ये त्यांच्या कुटुंबियांसोबत राहतात. गेल्या वर्षी जून महिन्यांत त्यांनी नालासोपारा येथे एक फ्लॅट बुक केला होता, याच फ्लॅटसाठी त्यांनी विकी सिद्धीकी या व्यक्तीला सुमारे अठरा लाख रुपये दिले होते. मात्र दिलेल्या मुदतीत विकीने त्यांना फ्लॅटचा ताबा दिला नाही तसेच फ्लॅटसाठी घेतलेले पैसे परत केले नाही. २२ जून २०२० रोजी त्यांनी शिवसेनेचे नेते नितीन नांदगावकर यांच्या फेसबुकच्या फॅन



क्लबमध्ये ही माहिती पोस्ट करून त्यांच्याकडे मदतीची विनंती केली होती. त्यानंतर २३ जुलै २०२० रोजी किरण महाडिक नावाच्या एका व्यक्तीने फोन करून ते नितीन नांदगावकर यांच्या कार्यालयातून बोलत आहे, त्यांचा अर्ज त्यांना प्राप्त झाला असून त्यांचे पैसे वसुलीसाठी आपण प्रयत्न करू, त्यासाठी त्यांच्याकडून कुठलीही फी आकारली जाणार नाही. मात्र त्यांना त्यांच्या राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागेल असे सांगितले. त्यांनीही त्यास होकार दिला होता. त्यानंतर किरणने त्यांच्याकडे विविध कारण सांगून बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. २३ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत संदीप राजपूत यांनी किरणच्या सांगण्यावरून त्यांच्या बँक खात्यात १ लाख ५४ हजार रुपये जमा केले. मात्र ही रक्कम जमा करूनही त्यांच्याकडे आणखीन पैशांची मागणी होऊ लागली. हा प्रकार संशयास्पद वाटताच संदीप राजपूत यांनी नितीन नांदगांवकर यांच्या कार्यालयात जाऊन किरण महाडिक यांच्याविषयी चौकशी केली. यावेळी त्यांना तिथे कोणीही किरण महाडिक नावाचा व्यक्ती काम करीत नसल्याचे समजले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात भामट्यांविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध ४१९, ४२०, ३४ भादंवी सहकलम ६६ (सी), (डी) आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदविला होता. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तांत्रिक माहितीवरुन रोहित आणि सुरज या दोघांना सातारा येथून ताब्यात घेतले. चौकशीत रोहितच्या बँक खात्यात ही रक्कम जमा झाली होती. त्यासाठी त्याला सुरजने करण्यास प्रवृत्त केले होते. या दोघांनीच संदीप यांना संपर्क साधून त्यांना मदतीचे आश्वासन देऊन त्यांची ऑनलाईन फसवणूक केली होती. त्यामुळे या दोघांनाही नंतर पोलिसांनी अटक केली. सध्या ते दोघेही पोलीस कोठडीत असून त्यांची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. या दोघांनी अशाच प्रकारे इतर काही गुन्हे केले आहे का याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

## महाराष्ट्रात थंडीच्या कडाक्याचा प्रभाव कमी राहणार

यंदा संपूर्ण देशभरात राजस्थान, नवी दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, लडाख यासोबतच इतर राज्यात मुख्यत्वेकरून उत्तर आणि उत्तर पश्चिम भारतात यंदा थंडीचा कडाका सर्वाधिक असणार आहे. भारतीय प्रादेशिक हवामान केंद्राकडून डिसेंबर २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीतल्या हवामानाचा अंदाज वर्तवणारी माहिती जाहीर करण्यात आली आहे. थंडीच्या मौसमात तापमान हे सरासरीपेक्षा अधिक असेल अशी माहिती हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामध्ये उत्तर, उत्तर पश्चिम, मध्य भारतात तापमान हे सरासरीपेक्षा कमी असेल. दिल्लीत गेल्या दशकातली सर्वात कडाक्याची थंडी गेल्या वर्षी नोंद झाली आहे. गेल्यावर्षी



दिल्लीत ७ डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सरासरीपेक्षा ही तापमानाची नोंद ही ३ डिग्री सेल्सिअसने कमी होती. आगामी तीन महिन्यांच्या कालावधीसाठी राजस्थान, पूर्व राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, लडाख, छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश आदी भागातही तापमान हे सरासरीपेक्षा कमी असेल. तर मध्य महाराष्ट्र, कोकण आणि दक्षिण पेनिनसुला भागात तापमान हे सरासरीपेक्षा अधिक असेल. त्यामुळे यंदा थंडीचा प्रभाव कमी असेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

यंदा ला निनाचा प्रभाव हा थंडीवर असणार आहे. ला निनाच्या वातावरणामुळे किमान तापमान हे सरासरीपेक्षा अधिक असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.


( मुंबई पब्लीक ट्रस्ट कायदा 1950 नुसार रजिस्टर रजि.न.ई/7482/ठाणे 11-04-2012 ) प्राप्तीकर कायदा 1961 च्या 80G अंतर्गत र सवलतीस पात्र )
THN/C.I.T.-I/Tech.1/12A/32/2013-14 w.e.f 10/12/2012 THN/C.I.T-I/Tech.1/80G/36/2013-14 w.e.f 10/12/2012
www.asraytrust.com Email : asraytrust2012@gmail.com

आश्रय ट्रस्ट

सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक

कला, साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक व वैद्याकिय क्षेत्राला वाहून घेतलेली पंजीकृत संस्था

NITI AAYOG UNIQUE ID : MH/2018/0196753

संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक



5 राजाराम अपार्टमेंट, नवघर रोड, भाईंदर ( पूर्व ), ठाणे. 401105
9594418181 / 8424989898 / 9664966499 / 7400001474


## झेडीपीच्या 14 हजार कर्मचाऱ्यांना लातूर जिल्हा परिषदेने दिला दणका; वृद्ध आई- वडिलांचा सांभाळ न करणाऱ्यांचा 30 टक्के पगार कपात

वृद्ध आई वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या लातूर जिल्ह्यातील झेडीपी कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेने दणका दिला आहे. पगारातली ३० टक्के रक्कम कापून ती वृद्ध आईवडिलांच्या बँक खात्यात टाकली जाणार असल्याचा ऐतिहासिक निर्णय लातूर जिल्हा परिषदेने घेतला. जिल्हा परिषदेच्या १४ हजार कर्मचाऱ्यांना हा निर्णय लागू असणार आहे. असा निर्णय घेणारी लातूर ही राज्यातली पहिली जिल्हा परिषद बनली आहे. ज्या आई-वडिलांनी आपल्याला जग दाखवलं त्यांना वृद्धापकाळात अनेक जण वृद्धाश्रमात ठेवतात. अनेक जण त्यांच्यासोबत राहात नाहीत. अशी उदाहरण आपण समाजात पाहात असतो. मात्र आता लातूर जिल्हा परिषदेने आपल्या १४ हजार कर्मचाऱ्यांसाठी नवा नियम लागू केला आहे. जे कर्मचारी वृद्ध आई-वडिलांपासून लांब राहात असतील त्यांच्या-त्यांच्या पगारातली ३० टक्के रक्कम कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही रक्कम वृद्ध मातापित्यांच्या खात्यामध्ये जमा होईल.या निर्णयाचं कर्मचारी आणि त्यांच्या मातापित्यांनीही स्वागत केले आहेनेहमीच आपल्या विविध उत्तम उदाहरणमुळे चर्चेत राहणाऱ्या



लातूर जिल्हा परिषदेच्या या पॅटर्नचे अनुकरण राज्यात होणे गरजेचे आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898